# नियमीत दिवाणी मुकदमा क्र. २४०/१९८८ मधील निशाणी क्र. ९२ वर आदेश

१. सदरचा अर्ज वादीने मुळ दाव्यामध्ये दुरूस्ती करण्यास परवानगी मिळणेकरीता व दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १ नियम ८(१)(बी) खालील तरतुदींनुसार परवानगी मिळणेकरीता दाखल केला आहे. सदर अर्जातील थोडक्यात कथन असे आहे की, नियमीत दिवाणी मुकदमा क्र. ५६२/८० मधील नि.क्र. १, नि.क्र. ६४ व नि. क्र. ६५ वरील आदेशानुसार सदरचा दावा असंख्य लोकांचा पुढारी व प्रतिनिधी अशा दोन्ही स्वरूपात केलेला आहे. सदर प्रकरणातील नि.क्र. ४७ वरील आदेशानुसार मुळ वादीला सर्व लोकांचे प्रतिनिधी म्हणून दाखल होण्यास परवानगी दिलेली आहे. त्या आदेशाबाबत वरीष्ठ न्यायालयामध्ये दाद मागितली नाही. परंतु नि.क्र. १ वर दुरूस्ती करताना वादीच्या नावापुढे वारसांचा व सर्वांच्या प्रतिनिधीच्या नात्याचा उल्लेख करणे राहून गेले आहे. तसेच नि.क्र. ४७ वरील आदेशानुसार तसा उल्लेख करण्याचे अनावधानाने राहून गेले आहे. तसेच सदर दावा प्रतिनिधीक स्वरूपात चालविण्यासाठी जाहीर नोटीस काढण्याची प्रक्रिया अवलंबण्याची आवश्यकता नाही. तथापि तक्रारीला वाव नको म्हणून जाहीर नोटीस प्रसिध्द करून दाव्याचे काम चालवावे असे वादीला वाटत आहे. त्यामुळे अर्जात नमूद केल्याप्रमाणे दुरूस्ती करण्यास व दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १ नियम ८(१)(बी) खालील तरतुदींनुसार परवानगी मिळणेची वादीने विनंती केलेली आहे.

२. सदर अर्जाला प्रतिवादीने नि.क्र. ९६ म्हणणे देऊन तीव्र विरोध दर्शविला आहे. सदर म्हणण्यामधील थोडक्यात कथन असे आहे की, सदर अर्जातील मागणी कायद्याने चालू शकत नाही. अर्ज उशीरा दाखल केलेला आहे. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती प्रतिवादीने केलेली आहे.

३. सदर प्रकरणामधील वादीचा युक्तिवाद ऐकला. तसेच प्रकरणातील कागदपत्रांचे अवलोकन केले.

४. सदर प्रकरणातील कागदपत्रांच्या अवलोकनावरून याठिकाणी नमूद करणे आवश्यक वाटते की, अर्जात नमूद नि.क्र. ४७ वरील अर्जाचे व अर्जावरील आदेशाचे अवलोकन केले. सदर नि.क्र. ४७ वरील अर्जामध्ये ''व्यंकटेश पद्माचार्य वरखेडकर'' ऐवजी ''भिमसेन व्यंकटेशाचार्य (भिमाचार्य बाळाचार्य) वरखेडकर'' असे नाव नमूद करण्याची परवानगी मागितली होती. सदर अर्जावर न्यायालयाने दि. १०/०७/१९८९ रोजी आदेश पारित करून अर्ज मंजूर केलेला आहे. सदर आदेशानुसार वादीने मुळ दाव्यामध्ये दुरूस्ती केलेली आहे. सदर नि.क्र. ९२ वरील अर्जामधील कथनावरून याठिकाणी नमूद करणे आवश्यक वाटते की, नि.क्र. ४७ वरील अर्जानुसार वादीला न्यायालयाने केवळ दाव्याच्या सरनाम्यामध्ये बदल करण्याऐवजी इतर कोणत्याही दुरूस्तीला परवानगी दिलेली नाही. त्यामुळे सदर अर्जात नमूद केल्याप्रमाणे नि.क्र. ४७ वरील अर्जावरील आदेशाची पुर्तता करण्याचे राहिल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे सदरचा दुरूस्तीचा अर्ज चालू शकत नाही. तसेच सदरचे प्रकरण सन १९८८

पासून प्रलंबित आहे. सदर प्रकरणातील वादीला दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १ नियम ८(१)(बी) खालील तरतुदींनुसार परवानगी दावा दाखल करतेवेळी घेणे आवश्यक होती. त्यामुळे सदर दाव्यातील मागणीचे स्वरूप व प्रकरणाचा प्रलंबित कालावधी विचारात घेवून अर्जात मागणी केल्याप्रमाणे परवानगी देणे न्यायाचित होणार नाही. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर होणेस पात्र आहे. सबब मी शेवटी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आदेश

१. नि.क्र. ९२ वरील अर्ज नामंजूर करणेत येत आहे.

२. येणेप्रमाणे अर्ज निकाली काढण्यात आला.

सही/—
दि. २४/०९/२०१४.          (शि. म. गौरगोंड)
सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, पंढरपूर.